# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र- १९२** **दिनांक :- २२/१०/२०२६**

## जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी! "धरणगाव पोलीस ठाण्यातील दाखल जबरी चोरीच्या गुन्ह्यात मागील ०२ वर्षांपासून फरार असलेले ०२ पाहिजे आरोपी जेरबंद "

**मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव** यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी यांना त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदारांची **विशेष पथके** तयार करून जिल्ह्यात दाखल गुन्ह्यांतील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यासाठी तसेच पाहिजे व फरार आरोपींची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने **विशेष मोहीम** प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते.

त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून त्यांना पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याबाबत मार्गदर्शन व सूचना दिल्या होत्या.

सदर मोहिमेदरम्यान दिनांक २१/१०/२०२६ रोजी विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांना विश्वसनीय बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की, **धरणगाव पोलीस ठाणे गु.र.नं. ४६०/२०२४, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०९(४), ३(५) अन्वये दाखल जबरी चोरीच्या गुन्ह्यातील मागील सुमारे दोन वर्षांपासून फरार असलेले पाहिजे आरोपी १) अजय भाईदास थोरात, वय २७ वर्षे, रा. नवलनगर, ता. जि. धुळे आणि २) संभाजी बाळू पाटील, वय २६ वर्षे, रा. सातरने, ता. जि. धुळे** हे धुळे जिल्ह्यात असल्याची गोपनिय माहिती मिळाली प्राप्त माहितीच्या आधारे विशेष पथक तात्काळ धुळे जिल्ह्यात रवाना झाले. पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींचा शोध घेऊन त्यांना शिताफीने ताब्यात घेवुन, पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी धरणगाव पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव, मा. श्री. सुनील पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा उपविभाग आणि श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष पवार, पोहेकॉ हरिलाल पाटील, पोहेकॉ विलेश सोनवणे, पोकॉ राहुल कोळी, पोकॉ विलास गायकवाड व चापोको महेश सोमवंशी यांच्या पथकाने केली आहे.**

***" जळगाव जिल्हा पोलीस दलाकडून पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याची विशेष मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे "***

*******************************************************************************